# महाराष्ट्र शासन

## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/ 2021/ 157 दिनांक:- 13 JAN 2021

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये MHT-CET या सामायिक परीक्षेकरीता केंद्र निश्चितीबाबत.
संदर्भ:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनाय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम//2021/20, दि. 12/01/2021

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाकरीता होणारी MHT-CET-2021 परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना दुर अंतरापर्यंत परीक्षा केंद्रावर जाऊ नये यासाठी तालुका स्तरावर परीक्षा केंद्र निर्धारित करण्याबाबत मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांनी निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार आपल्या संस्थेत संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या Specification नुसार 100 संगणक उपलब्ध असल्यास त्याबाबतची माहिती खाली दिलेल्या **Link मध्ये Google form** मध्ये **तात्काळ** भरण्यात यावी. तसेच ज्या संस्थेकडे वरीलप्रमाणे संसाधणे उपलब्ध नाहीत त्यांनी सुध्दा संस्थेमध्ये संसाधणे उपलब्ध करून घेऊन **दि. 07/02/2021 पर्यंत** Google form मध्ये माहिती सादर करावी.

**LINK:**
**https://forms.gle/ziJyudiFq8sLLfrY7**

**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२१/२० दिनांक : 12 JAN 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये MHT CET या सामायिक प्रवेश परीक्षेकरिता केंद्र निश्चितीबाबत...

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, प्रथम वर्ष अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, फार्म डी, कृषी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेमार्फत MHT CET या सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात येते. या परीक्षेसाठी राज्यातील इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र असतात . कोविड १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर MHT CET २०२० करिता विद्यार्थ्यांना दूर अंतरापर्यंत परीक्षा केंद्रावर जावे लागू नये यासाठी तालुकास्तरावर या परीक्षेची केंद्र निर्धारीत करण्यात यावीत जेणेकरुन ते विद्यार्थी व पालक यांच्या सोयीचे होईल असे मा.मंत्रीमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार संचालनालय आणि Tata Consultancy Services (TCS) कंपनी या दोहोंच्या संयुक्त विद्यमाने सर्व विभागातील तालुका स्तरापर्यंतची केंद्रांची निवड करण्यात आली होती. मात्र सर्व केंद्र कार्यान्वीत करता आली नव्हती. (MHT CET २०२० करिता परीक्षा केंद्र म्हणून कार्यरत असलेल्या संस्थांची यादी सोबत जोडली आहे)

आता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये आयोजित करावयाच्या MHT CET या सामायिक प्रवेश परीक्षेकरिता राज्यातील प्रत्येक तालुका स्तरावर परीक्षा केंद्र असले पाहिजे अशा सूचना मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी दिलेल्या आहेत. त्यादृष्टीने आपल्या विभागाच्या अधिनस्त येणा-या तालुका स्तरावरील परीक्षा केंद्रांची निवड करण्यासाठी संस्थांचे परीक्षण करण्यात यावे. ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत असते या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्रांसाठी आवश्यक असलेले hardware and software specifications सोबत जोडले आहे. सदर परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी संस्थांचीही तेवढीच जबाबदारी असल्यामुळे सदरहू Specifications ची पूर्तता संस्थांकडून करून घ्यावी. कमीत कमी १०० परीक्षार्थींची परीक्षा घेता यावी इतकी परीक्षा केंद्राची क्षमता असावी.

उपरोक्त नमूद बाबीं विचारात घेऊन आपल्या विभागातील तालुका स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना MHT CET परीक्षा केंद्र म्हणून कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक ती संसाधने संस्थेत उपलब्ध करुन घेण्याच्या संस्थांना सूचना दयाव्यात. सदर संसाधने संस्थेत असल्याची खातरजमा करुन MHT CET सामायिक प्रवेश परीक्षा केंद्र म्हणून निर्धारीत करणे योग्य असल्याबाबत परीक्षण करण्यात यावे. तदनंतर आपल्या विभागातील तालुकास्तरावरील नियोजित परीक्षा केंद्रांची यादी संचालनालयास १५ फेब्रुवारी,२०२१ पर्यंत कळविण्यात यावी. तसेच MHT CET- २०२० परीक्षेकरिता आपल्या विभागातील ज्या संस्था परीक्षा केंद्र म्हणून कार्यरत होत्या त्या संस्थांनाही २०२१ मधील परीक्षेच्या आयोजनासाठी सज्ज राहण्याचे कळविण्यात यावे.

वरील बाबींचा अहवाल निश्चितपणे विहीत केलेलया मुदतीत संचालनालयास पाठविण्यात यावा.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\2021-22\MHT CET 2021 exam centre.docx

**iLEON OS is mandatory to conduct the assessment. Hence, ensure the ILEON OS is compatible on suggested computers.**

Please find the Client PC Minimum Hardware Requirement

Processor:- Intel Dual Core and above
RAM:- 4GB and above
HDD Space:- 250GB
Motherboard: Motherboard should have PXE enabled LAN card. (For Netboot OS)
Monitor – 16 inches and above
Monitor Should support screen resolution of 1024 X 768.
Keyboard should not be multimedia.

Network Requirement

Network Switch- GBPS
LAN Cable- CAT6
Distribution Layer switch should be manageable and loop prevention enabled.

Network Architecture

Modular Network.
STAR Topology
Physically Separate network for assessment.

Power Requirement

**Good to have:** UPS, DG Set

**Note- Finalisation of the center is only accepted if that will approve from the TCS iON audit.**